कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | श्रीम. वेदा धवल आगटे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. अशोक गोविंदराव भुताड | : | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ७. | कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई. | : | शासकीय प्रतिनिधी |
| ८. | श्री.चंद्रकांत राऊत | : | सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई. |
| ९. | श्री. अशोक तांबे | : | लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

केले तसेच मंडळाच्या सचिव यांनी मंडळाचे अध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस सुरूवात करण्याची परवानगी दिली. मंडळाच्या सचिव यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात येत असल्याचे सांगितले.

बैठकीची विषयसूची

| अ. क्र. | विषय | घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १. | **दि.१६.०६.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ३२ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.** | मा. अध्यक्षांच्या परवानगीने मागील बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| २. | **मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुंटुबियांसाठी राज्य शासनाची "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" लागू करणेबाबत.** | याबाबत बोलतांना मंडळाचे सचिव यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना खाजगी विमा ब्रोकर कंपनीमार्फत आरोग्य विमा योजना लागू करणे प्रस्तावित होते. त्यासाठी मंडळामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक २३.०६.२०१६ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु करावयाच्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या रुग्णालयाची अधिकची संख्या आणि मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा दर्जा हा खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य योजनांपेक्षा चांगला असल्यामुळे, तसेच बांधकाम कामगारांची संख्या पाहता विमा हफ्त्यापोटी करावा लागणारा खर्चही खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांपेक्षा फारच |

| | | |
|---|---|---|
| | | कर्मी असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत एक स्वतंत्र गट म्हणून बांधकाम कामगारांचा समावेश करण्यात यावा. यासाठी कामगार विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाने बांधकाम कामगारांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी संयुक्तरित्या कार्यपध्दती तयार करावी. तसेच बांधकाम कामगारांचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रस्तावित योजनेत समावेश करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये बांधकाम कामगारांचे नोंदणी प्रमाणपत्र / ओळखपत्र हा पुरावा म्हणून पुरेसा समजण्यात यावा. त्यासाठी इतर कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही, अशी तरतूद "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत करण्यात यावी, असेही निदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, असे मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांना सांगितले.<br><br>दि.२७.०६.२०१६ रोजी मा. कामगार आयुक्त, मंडळाचे सचिव, कामगार उप आयुक्त, श्री. काकतकर व मंडळाचे लेखाधिकारी यांची मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्य विमा योजना लागू करणेबाबत त्यांचे पात्रता व निकष यावर चर्चा केली. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी कामगारांचे ओळखपत्र व कुटूंबियांसाठी नाते संबंधाचा पुरावा म्हणून रेशनकार्ड व त्यांचे फोटो आयडी घेण्याबाबतही ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने दि.२७.०६.२०१६ रोजी मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.<br><br>तद्नंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२२.०७.२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरून सदर योजना बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना लागू करण्याकरीता निर्गमित करावयाच्या शासन निर्णयाचे प्रारूप शासनास दि.२९.०७.२०१६ रोजी सादर करण्यात आलेले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१६ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये सदरची योजना दि.०२.१०.२०१६ पासून संपूर्ण महाराष्ट्रात |

| | | |
|---|---|---|
| | | लागू होणार आहे.<br>मा.मंत्री (कामगार) महोदय यांनी असे सूचविले की, कामगारांना सदर योजनेची माहिती व्हावी या दृष्टिकोनातून सदर योजनेची प्रसिध्दी होण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये विविध ठिकाणी सदर योजनेबाबत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, जेणेकरुन, जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. यावर मा. कामगार आयुक्त यांनी त्याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्याच्या सूचना मंडळाच्या सचिव यांना दिल्या.<br>याबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव :**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले जन आरोग्य विमा योजनेची कामगारांना माहिती व्हावी या दृष्टीकोनातून सदर योजनेबाबत राज्यस्तरावर तसेच सर्व विभागीय स्तरांवर कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत सर्वानुमते ठराव घेण्यात आला.** |
| ३. | **मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्य यंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत.** | मंडळाच्या सचिव यांनी सांगितले की, मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि. ०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोंदणीसाठी आवश्यक माहिती/कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आला. तसेच मंडळाच्या दि. ०२.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने RFP Document तयार करण्यासाठी मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल.पी.पी. या कंपनीच्या Consultant ची नियुक्ती करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणालीच्या अंमलबजावणी, संचालन व देखभालीकरिता व्यवस्थापन सेवाप्रदात्याच्या (Management Service Provider) निवडीचे (RFP) Document बनवून घेवून कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणालीद्वारे मंडळाचे कामकाज कशा पद्धतीने करण्याचे प्रस्तावित आहे, याबाबत मंडळाच्या दिनांक २९.०३.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मंडळासमोर सविस्तर सादरीकरण करण्यात आले आहे.<br>मंडळाच्या दिनांक १६.०६.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये पुन्हा त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून सदर RFP Document वर शासनाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (Project Implementation Committee) दिनांक ०४.०६.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच, सदर प्रस्तावास दि.१२.०८.२०१६ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या (HPC) बैठकीमध्ये देखील मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, सदर बैठकीचे इतिवृत्त अद्याप शासनाकडून अप्राप्त आहे. HPC बैठकीचे इतिवृत्त व शासन निदेश प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकल्पाची ई-निविदा प्रसिध्द करणे अपेक्षित आहे, असे सचिव यांनी सांगितले.<br>त्यावर मंडळाचे अध्यक्ष यांनी असे नमुद केले कि, सदर प्रकल्पासाठी बनविण्यात आलेल्या अटी व शर्ती मंडळासमोर ठेवण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे सदर अटी व शर्तीमध्ये गरजेनुसार बदल करण्याची मंडळास मुभा असावी असे नमुद केले यावर मा. कामगार आयुक्त यांनी सदर प्रकल्पांचे सविस्तर सादरीकरण मंडळाच्या दिनांक २९.०३.२०१६ रोजी पार पाडलेल्या बैठकीत करण्यात आले असून याबाबत वेळोवेळी मंडळ बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले. तसेच, सदर प्रकल्पाचे RFP बनविणे व त्याच्या अटी व शर्ती तयार करण्यासाठीचे तज्ञ आपल्याकडे नसल्यामुळे मंडळाने मे. अर्न्सट अँड यंग यांच्या Consultant ची नियुक्ती केलेली आहे. त्यांनी तयार |

| | | |
|---|---|---|
| | | केलेल्या RFP Document ला शासनाचे उच्चस्तरीय अधिकारी असलेल्या PIC व HPC या समित्यांची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे आता सदर प्रकल्पाच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे योग्य ठरणार नाही. तथापि, सदर अटी व शर्तीचे मंडळास अवलोकन करता येऊ शकेल, असे मा. कामगार आयुक्त म्हणाले.<br>त्यानुसार मंडळांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या Consultant नी प्रकल्पाच्या अटी व शर्ती पुन्हा एकदा मंडळासमोर सादर केल्या. सदर सादरीकरण झाल्यानंतर मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या मान्यतेशिवाय या विषयीची ई-निविदा प्रक्रीया अंतिम केली जाणार नाही. त्यामुळे याबाबत शासनाच्या HPC कमिटीच्या बैठकीचे इतिवृत्तांत/ मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रसिध्द करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत शासनाच्या HPC कमिटीच्या बैठकीचे इतिवृत्तंत/मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रसिध्द करण्याचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.** |
| ४. | **मंडळांतर्गत सुधारीत योजनांच्या अर्जाचे नमुने व योजनानिहाय Checklist ला मान्यता घेणे.** | मंडळाच्या दि.१८.०१.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीत योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करणेबाबतचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने मंडळाच्या योजनांमध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.०४.०२.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. दि.१६.०६.२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये शासनाने सदर ठरावास मान्यता देऊन योजनांच्या लाभाच्या रकमेमध्ये वाढ करण्यास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने |

| | | |
|---|---|---|
| | | मंडळाच्या योजनांच्या अर्जाचे नमुने, तसेच अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी तयार केली असून ते मंडळाचे मा. अध्यक्ष व मंडळाचे सदस्य यांना दि.२६.०७.२०१६ रोजी माहितीकरीता व त्यांच्या अभिप्रायांकरीता पाठविण्यात आले आहेत. सदर अर्ज व त्यासोबत जोडावयाच्या कागदपत्रांसंदर्भात मंडळ सदस्यांनी आपले अभिप्राय सादर करावेत, असे सचिव म्हणाल्या. त्यावर कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी सुचविलेल्या खालील सुधारणा करुन अर्जाचे नमूने व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी अंतिम करण्यात आली.<br>१. मंडळाकडे पहिली वर्गणी भरल्याची तारीख व रक्कम (पावती जोडावी) :-<br>**अभिप्राय** : अनेक सभासद ४ ते ५ वर्षापूर्वी सभासद झालेले आहेत. पावती असेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे पहिल्या नोंदणीच्या तारखेचा, पावतीचा आग्रह अयोग्य व जाचक आहे.<br>**२. मंडळाकडे शेवटची वर्गणी भरल्याची तारीख व रक्कम (पावती जोडावी) :-**<br>**अभिप्राय** : पावतीची झेरोक्स प्रत असा उल्लेख असावा :-<br>**अर्ज क्र.१९. पत्नी असल्याचा कायदेशीर पुरावा सोबत जोडला आहे काय?**<br>**अभिप्राय** : कायदेशीर पुरावा असेलच याची शाश्वती नाही आधार कार्ड किंवा रेशन कार्ड यावरुन सदर व्यक्ती अर्जदाराची पत्नी आहे किंवा नाही हे ओळखणे शक्य आहे. त्यामुळे पत्नी असण्याचा "कायदेशीर पुरावा" असा उल्लेख न करता केवळ "पुरावा" असा उल्लेख करावा.<br>**सर्व अर्जासाठीच्या कागदपत्रांच्या यादी विषयी**<br>१. नोंदणीची किंवा नुतनीकरणाची पावती यापैकी एक असा उल्लेख असावा.<br>२. बांधकाम मालक / कंत्राटदार / ठेकेदार यांच्याकडे मागीलवर्षी काम केल्याचे प्रमाणपत्र मागण्यात येऊ नये. |

| | | |
|---|---|---|
| | | **अर्ज क्र.१**<br>प्रसुती जर शस्त्रक्रियेद्वारे झाली असेल तर त्याचा संपूर्ण खर्चाच्या पावत्या मागण्यात येऊ नये. केवळ प्रसूतिबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व बाळाचे जन्म प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>**अर्ज क्र.२**<br>* बोनाफाईड सर्टिफिकेट असल्यानंतर पुन्हा शाळेचा दाखला घेणे अपेक्षित नाही.<br>* कामगाराच्या पाल्याच्या शैक्षणिक आर्थिक सहाय्यासाठी पत्नीच्या आधार कार्ड / मतदान कार्ड / पॅन कार्ड इ. ची आवश्यकता नाही.<br>**अर्ज क्र.४**<br>११ वी १२ वी शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याचा पुरावा असा उल्लेख करावा प्रवेश पावती अपेक्षित नसावी.<br>**अर्ज क्र.१३**<br>गंभीर आजारी व्यक्तीच्या वयाबाबतच्या पुराव्याची आवश्यकता नसावी.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**कामगार प्रतिनिधी श्री कुटासकर यांनी सुचविलेल्या उपरोक्त सुधारणांसह मंडळाच्या योजनांचे अर्जांचे नमूने व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या यादीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर अर्जाचे नमुने व कागदपत्रांची यादी सर्व जिल्हा कार्यालयांना उपलब्ध करून देऊन यापुढे लाभार्थ्यांना त्याप्रमाणे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ५. | मंडळातील नोंदीत बांधकाम | सदर विषयाबाबत चर्चा करतांना सचिव असे म्हणाल्या की, दि.०८.१०.२०१५ |

| | | |
|---|---|---|
| | कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यास आर्थिक सहाय्य देणेबाबत ठराव घेणे. | रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाने बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्यूकरीता प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबत आदेशीत केलेले आहे. मंडळामार्फत प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजना राबविण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. तथापि, मंडळाकडील नोंदणी ही सतत/रोजच होणारी प्रक्रिया असल्याने काही नोंदीत कामगारांचे प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजनेंतर्गत समावेश होण्याआधीच त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास आर्थिक सहाय्य मिळावे या हेतूने रू.२ लाख इतका लाभ देणेबाबत ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.<br><br>**याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.**<br><br>ठराव :<br>**बांधकाम कामगाराचा कामावर असतांना किंवा नसतांना कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.२ लाख इतके अर्थसहाय्य देण्याबाबत ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. सदर ठरावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी व पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना किंवा मंडळाची सदरची योजना यापैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ संबंधित कामगाराच्या वारसास घेता येईल, असेही सर्वानुमते ठरले.** |
| ६./ ११. | विषय ६ :<br>i) केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. | सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. केवळ सोशल सिक्युरिटी |

| | | |
|---|---|---|
| | **मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करणे.** | योजनेतंर्गत अंतर्भूत नसणा-या १८ ते ४० वयोगटातील व इन्कम टॅक्स पेयर नसणा-या बांधकाम कामगारांसाठी सदर योजना लागू करण्याचे निकष आहेत. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी लाभार्थीचे बचत खाते असणे, मोबाईल क्र. असणे अनिवार्य आहे.<br>यावर मंडळाचे सध्या मॅन्युअल पध्दतीने चालू असलेले काम, कामाचा व्याप व उपलब्ध कर्मचारी संख्या विचारात घेता मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार सोशल सिक्युरिटी योजनेंतर्गत अंतर्भुत आहेत किंवा नाहीत, इन्कम टॅक्स पेपर आहेत किंवा नाहीत, तसेच त्यांचे बचत खात्याचा तपशील व मोबाईल क्रमांक इ. बाबी तपासणे मंडळास सध्या शक्य नाही. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी, अशी चर्चा घडून आली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**मंडळाचे सध्या मॅन्युअल पध्दतीने चालू असलेले काम तसेच, कामाचा व्याप व उपलब्ध कर्मचारी संख्या विचारात घेता मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार सोशल सिक्युरिटी योजनेंतर्गत अंतर्भुत आहेत किंवा नाहीत, इन्कम टॅक्स पेपर आहेत किंवा नाहीत, तसेच त्यांचे बचत खात्याचा तपशील व मोबाईल क्रमांक इ. बाबी तपासणे मंडळास सध्या शक्य नाही. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| | **ii) बांधकाम कामगाराच्या आय आय टी वा तत्सम शिक्षण घेणाऱ्या** | केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशानुसार बांधकाम कामगारांच्या आयआयटी वा तत्सम शिक्षण घेणा-या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना लागु |

| | |
|---|---|
| **पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना** | करणेबाबत सविस्तर चर्चा करुन मंडळाने ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे, असे सचिव यांनी सांगितले. त्यावर मा. अध्यक्ष यांनी प्रतिवर्ष रू. १ लाख अर्थसहाय्य देण्यात यावे, असे प्रस्तावित केले. मा. संचालक (लेखा व कोषागार) यांनी सदर अर्थसहाय्य प्रतिवर्ष रू. १ लाख देण्यात यावे, असे प्रस्तावित केले. सदर विषयाच्या चर्चे दरम्यान मा. मंत्री (कामगार) महोदयांनी ऑलंम्पिक खेळाडू श्रीमती ललिता बाबर या बांधकाम कामगाराची मुलगी असल्याने त्यांना रु.१ लाख प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे असा मुददा मांडला त्यास सर्व उपस्थित सदस्यांना सहमती दर्शविली. सदर प्रस्तावावर सखोल चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**बांधकाम कामगाराच्या आय आय टी व आय आय एम चे शिक्षण घेणाऱ्या पाल्यांसाठी रु.१ लाख प्रतिवर्ष शिष्यवृत्ती देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. तसेच** ऑलंम्पिक खेळाडू श्रीमती ललिता बाबर या बांधकाम कामगाराची मुलगी असल्याने त्यांना रु.१ लाख प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे असाही ठराव सर्वानुमते घेण्यात आला. |
| **iii) केंद्र शासनाची कौशल्य वृध्दी योजना.**<br>**बांधकामाच्या ठिकाणी कामगारांना विविध व्यवसायांमध्ये प्रशिक्षण देणे,कारपेंटी, ड्रायव्ह, प्लमंबिग** | **Recognition of Prior Learning for Construction Workers**<br><br>१.केंद्र शासनाने बांधकाम क्षेत्रातील कामगारांची उत्पादन क्षमता व रोजगार क्षमता वाढविण्यासाठी ही योजना सर्व राज्यात लागु केली आहे.<br><br>२.कौशल्यवृध्दी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी एकुण (०५) Training Providers(TP) व ०९ Assessing Bodies (AB) चे एम्पॅनेलमेंट करण्यात आलेले |

| | | |
|---|---|---|
| | | आहे.<br><br>३.प्रशिक्षणाचे विषय:- सदर योजनेत एकूण ०६ विषयांची (बार बेंडींग, मेसेनरी, शटरींग कारपेंटरी, प्लम्बिंग, पेंन्टीग, स्कॅफोल्डींग) निवड केलेली आहे.<br><br>४. Training Providers (TP):- हे २०० पेक्षा जास्त बांधकाम कामगार काम करीत असलेल्या साईट वर प्रशिक्षण आयोजित करतील.<br>प्रशिक्षणाचा खर्च:- रु. २७.५० प्रति तास म्हणजे एकूण १२० तासाचे रु. ३३००/- प्रति प्रशिक्षणार्थी व पगार नुकसानभरपाई म्हणून रु. ३५/- प्रति तास म्हणजे एकूण १२० तासाचे रु.४२००/- तसेच Assessment Charges (Pre-assessment and final assessment) रु. २०००/- केंद्र शासनाने ठरवुन दिला आहे.<br><br>५.शासनाने दिनांक ०२.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्याबाबत केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना या कार्यक्रमाखाली निधींची सांगड घालून या कार्यक्रमाच्या एकात्मिक अंमलबजावणीव्दारे कार्यप्रवण वयोगटातील १५ ते ४५ वर्षामधील उमेदवारांसाठी ही योजना प्रस्तावित केली असून २०% निधी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे हस्तांतरीत करण्यात बाबत प्रस्तावित केले आहे. हस्तांतरण शक्य नसल्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या मान्यतेने सदर योजना राबविता येईल. |

| | |
|---|---|
| | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने केलेली कार्यवाही / अभिप्राय**<br>केंद्र शासनाच्या सुचनेनूसार सदरची योजना फक्त नोंदित बांधकाम कामगारांसाठी लागू केली असल्यामूळे सदर योजनेची अंमलबजावणी मंडळामार्फतच होणे आवश्यक आहे.<br>Training Providers (TP) हे बांधकाम साईटची निवड करतील व अनोंदित कामगारांची नोंदणी करुन त्यांना प्रशिक्षण देतील, त्यामूळे सदर साईटवरील अनोंदित कामगारांची नोंदणी होऊन मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढू शकेल.<br>केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनान्वये दर निश्चिती केलेली आहे, त्यामूळे पुन्हा दर निश्चित करण्याची आवश्यकता नाही.<br>केंद्र शासनाने जाहिर केलेल्या एम्पॅनेलमेंट यादीतील आस्थापनांना सदरचे काम द्यावयाचे असल्यामूळे अन्य इतर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. (उदा.जाहिरात, टेंडर, इ.)<br>सदर एम्पॅनेलमेंट आस्थापनांबरोबर करार करुन सदर योजनेची अंमलबजावणी तात्काळ सुरु करता येईल.<br>सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी दि.२०.०५.२०१६ रोजी उक्त विषयी संबंधित आस्थापनाची बैठक आयोजित करुन (TPs) कडून प्रस्ताव घेण्यात आले.<br>उक्त प्रस्तावावर मंडळाची मान्यता घेऊन कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील ०५ विभागीय कार्यालयांसाठी ०५ स्वतंत्र एम्पॅनेलमेंट आस्थापनांची नियुक्ती करणे उचित होईल.<br>१. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने एम्पॅनेलमेंट केलेल्या आस्थापनांना पुढीलप्रमाणे |

कामकाजाचे वाटप प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र | विभागाचे नाव | एम्पॅनेलमेंट केलेल्या आस्थापनेचे नाव |
|---|---|---|
| १. | कोकण विभाग | IL & FS Skills, Noida. |
| २. | पुणे विभाग | Labournet Services India Pvt Ltd. Banglore |
| ३. | नाशिक विभाग | Bhaskar Foundation,Delhi |
| ४. | औरंगाबाद विभाग | G&G Skill Developers (P) Ltd., Hariyana |
| ५. | नागपुर विभाग | Sushil Bahuuddeshiya Shikshan Sanstha. Nagpur. |

**यावर सविस्तर चर्चेअंती मा.मंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले:-**

ठराव :

मंडळामार्फत नोंदित बांधकाम कामगारांस केंद्र शासनाची कौशल्य वृध्दी ही योजना लागू करावयाची आहे, नोंदित बांधकाम कामगारांना प्रशिक्षण दिले तर त्यामुळे त्यांना नक्कीच फायदा होईल. यासाठी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली उक्त ०५ एम्पॅनेलमेंट असलेल्या कंपन्यांचे सादरीकरण पाहण्यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात यावी, असे मा. मंत्री महोदय

| | | |
|---|---|---|
| | | (कामगार) यांनी निदेश दिले व तसा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. |
| ७. | **५० दिवस काम केलेल्या मनरेगा कामगारांची मंडळाकडे नोंदणी करुन घेणे.** | सचिव यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.२५.०२.२०१३ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत काम करणा-या बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळात करण्यात यावी असे नमूद आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामगार हे ग्रामीण असल्याने त्यांची नोंदणी व कामाचे नियंत्रण हे जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत होत असल्याने संबंधित जिल्हयांचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठीत करण्याच्या उक्त शासन निर्णयानुसार सूचना आहेत. त्याअनुषंगाने दि.१५.०३.२०१३ रोजी मा. कामगार आयुक्त यांचेमार्फत सर्व जिल्हाधिकारी यांना बांधकाम कामगारांची नोंदणी व समन्वय समिती गठीत करण्याकरीता अर्धशासकीय पत्र निर्गमित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मंडळाकडे जिल्हा स्तरावर मनरेगा अंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी केली जाते. सध्या मंडळाकडे मनरेगा अंतर्गत ७१२६ बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे.<br><br>याबाबत केंद्र शासनाने त्यांचे आदेश दिनांक १२.०७.२०१३ अन्वये मनरेगा अंतर्गत बांधकाम क्षेत्रात मागील वर्षभरात किमान ५० दिवस काम केलेल्या कामगारांची मंडळाकडे बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याबाबत मंडळाने विचारविनिमय करून ठराव घ्यावा, असे सचिव यांनी प्रस्तावित केले.<br><br>**याबाबत सखोल चर्चेअंती पुढील ठराव घेण्यात यावा :-**<br><br>ठराव :<br><br>**मनरेगा अंतर्गत बांधकाम क्षेत्रात किमान ९० दिवस काम करणाऱ्या** |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव :**<br>**वाळू उपसा व दगडफोड करणारे कामगार हे देखील बांधकामाशी संबंधितच काम करीत असल्याने, त्यांचीदेखील मंडळाकडे 'बांधकाम कामगार' म्हणून नोंदणी करुन घेण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. याबाबत शासनास प्रस्ताव सादर करून सदर बाबतची अधिसूचना निर्गमित केल्यानंतर वाळू उपसा करणारे व दगड फोड करणारे कामगार यांची मंडळात नोंदणी करून घेण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ९. | **मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडे तत्वावर घरे पुरविण्याच्या योजनेबाबत.** | केंद्र शासनाने दि. ०५.०८.२०१५ च्या पत्राव्दारे "सर्वांसाठी आवास" ही योजना गृहनिर्माण व नागरी गरीबी निर्मूलन मंत्रालयाव्दारे दि. २५.०६.२०१५ रोजी लागू केली असल्याचे कळविले आहे. या योजनेअंतर्गत नागरी भागातील गरीबांकरीता पक्के घर देण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेच्या पार्श्वभूमीवर केंद्रशासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ च्या कलम ६० अन्वये सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशांना कल्याणकारी योजनेअंतर्गत नोंदीत बांधकाम कामगांराकरीता भाडे तत्वावरील घरांचा संचय (Rental Housing Stock) तयार करण्याबाबत कळविले आहे.<br>मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दि.२३.०६.२०१६ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांसाठी प्रायोगिक तत्वावर सुरूवातीस विभागीय स्तरावर भाडेतत्वावर घरकूल योजना राबविण्यात यावी. त्यासाठी संबंधित महानगरपालीका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडुन जागा उपलब्ध करवून घ्यावी व शासनाच्या सर्व संबंधित विभागांच्या सहमतीने घरकूल योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात यावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिलेले आहेत. तसेच जो बांधकाम कामगार सलग सुमारे १० वर्षे एकाच ठिकाणी वास्तव्य करता असेल/ भाडे भरत असेल अशा बांधकाम कामगारांस विशिष्ट कालावधी पूर्ण झाल्यावर सदरची |

| | |
|---|---|
| | जागा त्यांच्या मालकीची करणेबाबत विचार करण्यात यावा. सदर योजना राबविण्याबाबत मंडळाचे सदस्य श्री. सतीश मगर, मालक प्रतिनिधी यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे असे सूचविण्यात आलेले आहे. मंडळाकडे यापूर्वी घरे बांधण्याचा अनुभव व सक्षम क्षमता नाही त्यामुळे बांधकामाची प्रस्तावित ठिकाणे, जागेची उपलब्धता सदनिकेचे आकारमान, सक्षम प्राधिकरणांची मंजूरी, अंदाजित खर्च, प्रत्यक्ष अंमलबजावणी इत्यादी बाबत सविस्तर चर्चा होऊन सदर योजना राबविण्याबाबत सिडको नगरविकास विभाग, म्हाडा (गृहनिर्माण विभाग) यांची शासन स्तरावर एक बैठक आयोजित करून योजना राबविण्याबाबत व मंडळाचे मालक प्रतिनिधी श्री. सतीश मगर यांना मार्गदर्शन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.१२.०८.२०१६ रोजी सादर करण्यात आलेला आहे.<br><br>मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. ओमप्रकाश यादव यांचेकडून मंडळातील बांधकाम कामगारांना घरे उपलब्ध करून देण्याबाबतच्या योजनेचे दोन प्रारूप प्रस्ताव दि०९.०८.२०१६ रोजी मंडळास प्राप्त झालेले होते. सदर दोन्ही प्रारूप प्रस्ताव मंडळाच्या दि.१२.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेले आहेत.<br><br>मंडळाचे सदस्य मालक प्रतिनिधी श्री. सतीश मगर यांनी त्यांच्या दि.२६.०८.२०१६ रोजीच्या अहवालात बांधकाम कामगारांना घरे बांधण्याकरीता म्हाडा, एमएमआरडीए यांची मदत घेता येईल असे नमूद केले आहे.<br><br>मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या संबंधित अधिका-यांबरोबर सदर योजनेबाबत चर्चा केली असता म्हाडाच्या पुणे, नाशिक, औरंगाबाद या विकास क्षेत्रामध्ये अनुक्रमे १४४६, ११० व ४३४ अशा एकुण १९९० वेगवेगळया प्रकारच्या क्षेत्रफळाच्या तयार सदनिका विक्रीसाठी उपलब्ध असून त्यांचे दर अंदाजित पुणे येथे ३०० ते ४८० चौ.फूट साठी |

| | | |
|---|---|---|
| | | अंदाजित रक्कम रू.१५,८६,४४० ते २६,१०,००० एवढी आहे. नाशिक येथे २८.११ चौरस मिटर ते ४४.१२ चौ.मिटर त्याची किंमत अंदाजित रू.१०.८८,९५३ ते २६,०३,६७५ या दरम्यानची आहे. औरंगाबाद येथे ४०.६९ चौरस मिटर ते ५५.०४ चौरस मिटर ला रू.११,८९,७४९ ते रू.१२,६२,००० या दरम्यानची आहे.<br><br>मुंबई महानगर प्रदेश विभाग प्राधिकरण यांच्या अधिका-यांशी चर्चा केली असता मुंबई महानगर प्रदेश विभाग प्राधिकरणाच्या विभागामध्ये मीरा भाईंदर महानगर पालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका इ. च्या क्षेत्रामध्ये या ठिकाणी एकूण ९२,००० सदनिका उपलब्ध असून त्यातील ५० % सदनिका हया संक्रमण निवास म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत शासनाचे निर्देश असून उर्वरित ५० % सदनिकांबाबत स्पष्ट निर्देश प्राप्त नसल्याचे संबंधितांमार्फत कळविण्यात आले आहे. सदर उपलब्ध सदनिका बांधकाम कामगारांना भाडेतत्वावर देण्यासाठी मंडळामार्फत खरेदी करावयाची असल्यास त्याबाबत मा.मुख्यमंत्री यांचेमार्फत संबंधित विभागास निर्देश प्राप्त होणे आवश्यक असल्याचे संबंधित अधिका-यांनी चर्चेअंती सांगितले आहे.<br><br>यावर मा.कामगार आयुक्त यांनी असे सुचविले की, मंडळाअंतर्गत सदर योजना राबविण्याआधी अशा प्रकारच्या घरांची मंडळाकडील बांधकाम कामगारांना गरज आहे का तसेच सदर योजना राबविताना येणा-या संभाव्य अडीअडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना याचा सखोल अभ्यास करण्यासाठी तसेच या योजनेची सविस्तर रूपरेषा ठरविण्यासाठी एक तज्ञांची समिती गठीत करावी. सदर समितीमध्ये मा. अध्यक्ष. मालक प्रतिनिधी श्री मगर, १ सिव्हील इंजिनियर व १ आर्किटेक्ट असावेत असे मा. कामगार आयुक्त यांनी सुचविले. सदर समितीचा अहवाल आल्यानंतर शासन मान्यतेने सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी असेही मा. कामगार आयुक्त यांनी सुचविले. |

F:BOC Mtg 03.09.2016-VPV-SPS

| | | |
|---|---|---|
| | | त्यानुसार सर्वानुमते खालील ठराव घेण्यात आला.<br>ठराव :<br>मंडळांतर्गत भाडेतत्वावर घरे पुरविण्याची योजना राबविण्याआधी अशा प्रकारच्या घरांची मंडळाकडील बांधकाम कामगारांना गरज आहे का तसेच सदर योजना राबविताना येणा-या संभाव्य अडीअडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना याचा सखोल अभ्यास करण्यासाठी तसेच या योजनेची सविस्तर रूपरेषा ठरविण्यासाठी मा. अध्यक्ष, मालक प्रतिनिधी श्री मगर, १- सिव्हील इंजिनियर व १ आर्किटेक्ट यांची समिती गठीत करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. तसेच सदर समितीचा अहवाल आल्यानंतर शासन मान्यतेने सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी , असाही ठराव सर्वानुमते घेण्यात आला. |
| १०. | मंडळासाठी जिल्हा, विभाग व मुख्यालयासाठी स्वतंत्र कार्यालय उभारणे. | मंडळाच्या दि. ०७.०४.२०१४ रोजीचा ठराव व शासनाचे दि.२८.०८.२०१४ रोजीच्या पत्रानुसार तसेच, मंडळाच्या दि.२९.०३.२०१६ रोजीचा प्रस्ताव व शासनाच्या दि.१९.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन, मंडळांतर्गत प्रत्येक जिल्हा कार्यालयात १ लिपिक, १ डाटा एन्ट्री ऑपरेटर व १ कनिष्ठ लेखापाल तसेच प्रत्येक विभागीय कार्यालयात १ लिपिक, १ डाटा एन्ट्री ऑपरेटर व १ कनिष्ठ लेखापाल अशी पदे कंत्राटी पदधतीने भरलेली आहेत.<br>तसेच मंडळाच्या दिनांक २९.०३.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयामध्ये मंडळाच्या मुख्यालयासाठी एकूण ६३, विभागीय कार्यालयासाठी ४० व जिल्हा कार्यालयासाठी १७९ अशी एकूण २८७ कायमस्वरूपी पदे भरण्याबाबतचा सुधारित आकृतीबंध मंडळाच्या दिनांक ०१.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेला |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. तसेच, मा. कामगार आयुक्त यांचे पत्र दि. २०.०४.२०१६ मंडळासाठी आवश्यक पदांचे सेवाप्रवेश नियम शासनास सादर करण्यात आले आहेत.<br>मंडळाच्या कामाचा वाढता व्याप व उक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मंडळाच्या कामकाजाकरिता उपलब्ध अपुऱ्या जागेमुळे परभणी, रायगड जिल्हा कार्यालयांकडून मंडळाकडे स्वतंत्र कार्यालय उभारण्यासाठी जागा भाडे तत्वावर घेण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सध्या मंडळाकडे उपलब्ध असलेला अधिकारी/कर्मचारी वर्ग व भविष्यात नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता तसेच मंडळाच्या कामकाजाचा वाढता व्याप पहाता मंडळांतर्गत कामकाजासाठी जिल्हा व विभागीय स्तरांवर मंडळाचे स्वतंत्र कार्यालय उभारण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे, असे सचिव म्हणाल्या.<br>श्री.कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, विभागीय स्तरावर आपल्या मंडळाचे स्वतंत्र कार्यालय नाही. त्यामुळे मंडळाचे काम करणारे कर्मचारी हे इतरत्र ठिकाणी बसून त्यांचे काम पूर्ण करतात. त्याकरिता जिल्हा स्तरावर मंडळाचे स्वतंत्र कार्यालय असावयास हवे तसेच प्रत्येक विभागाकरिता स्वतंत्र वाहन खरेदी करण्याची मागणी देखील श्री.कुटासकर यांनी केली.<br>याबाबत सखोल चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**सध्या मंडळाकडे उपलब्ध असलेला अधिकारी/कर्मचारी वर्ग व भविष्यात नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता तसेच मंडळाच्या कामकाजाचा वाढता व्याप पहाता मंडळांतर्गत कामकाजासाठी जिल्हा व विभागीय स्तरांवर सुमारे ५०० ते १००० चौ.फूट क्षेत्रफळाचे कार्यालय भाडेतत्वावर घेण्यात यावे व सदर कार्यालयास आवश्यक फर्निचर स्थानिक पातळीवर नियमानुसार** |

| | | |
|---|---|---|
| | | **खरेदी करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १२. | **मंडळाच्या कामकाजाचे लेखे E-Form/Excel Sheet/ Digital Form मध्ये ठेवणेबाबत.** | सचिव यांनी सांगितले की, मंडळाच्या दैनंदिन जमा व खर्चाचे लेखे शासनाने प्राधिकृत केलेल्या रोखवहीच्या (Cash Book) विहीत नमुन्यात माहे एप्रिल २०१६ पासून सुरू करण्यात आले असून ते Excel Format मध्ये ठेवण्यात येत आहे. शासनाने वरील विहीत नमुन्यातील रोखवही हस्तलिखित पध्दतीने ठेवण्याची कार्यपध्दती अद्याप बंद केलेली नाही. तथापि, शासनाच्या संगणकीकरणाच्या धारेणात्मक निर्णयानुसार हस्तलिखित रोखवही ठेवणे अनिवार्य नाही, असे वाटते. तसेच मंडळाचे सर्व कामकाज शासनाच्या "E-Office" धोरणाप्रमाणे Digitize करण्याचे प्रस्तावीत असल्यामुळे मंडळाची दैनंदिन जमा व खर्चाची रोखवही (Cash Book) केवळ संगणकीय पध्दतीने ठेवणेबाबत मंडळाच्या बैठकीत मान्यता असावी. तसेच, सदर लेखे हस्तलिखित न ठेवता Excel Format ची महीना निहाय Print घेऊन जतन करण्याबाबत मंडळाची मान्यता असावी असे सचिव यांनी प्रस्तावित केले. मंडळाचे लेखा अधिकारी यांनी मागील काही महिन्यांची रोखवही मंडळासमोर सादर केली. सदर रोखवही चांगल्या प्रकारे बनवली असल्याचे अभिप्राय मा. संचालक (लेखा व कोषागारे)यांनी दिले. त्यावर सखोल चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**मंडळाच्या कामकाजाचे लेखे E-Form/Excel Sheet/ Digital Form मध्ये ठेवून त्याचीच प्रिंट घेऊन हार्ड कॉपी मध्ये ठेवण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १३. | मंडळांतर्गत जमा करावयाच्या उपकराची रक्कम D.D. व्यतिरिक्त | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ व नियम १९९८ मधील नियम (४ व ५) अन्वये उपकराची रक्कम ही मंडळाच्या नावाने |

| | | |
|---|---|---|
| | **शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांनुसार अन्य माध्यमांद्वारेही जमा करुन घेणेबाबत.** | रेखांकित केलेल्या धनाकर्षानेच भरणा करणे आवश्यक आहे.<br><br>याबाबत शासनाचे दि. ०७.०३.२०१४ च्या पत्रान्वये मा. मुख्य सचिव यांनी उपकराची रक्कम ECS द्वारे भरण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.<br><br>याबाबत सरकारी कामगार अधिकारी, वाशिम यांचेकडे असलेले एकुण ३२ न वटलेले धनादेशापैकी ३० धनादेश वटलेले असुन २ न वटलेल्या धनादेश अदा करण्याकरीता, कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग यांनी स.का.अ.,वाशिम यांचेकडे १५ दिवसांचा कालावधी मागितला होता. त्याअनुषंगाने स.का.अ., वाशिम यांनी न वटलेल्या धनादेशाची कार्यकारी अभियंता, वाशिम पाटबंधारे विभाग यांजकडील रक्कम शासनाने प्राधिकृत केलेल्या सी.एम.पी. या संगणक प्रणालीद्वारे स.का.अ., वाशिम यांनी मागणी केल्याप्रमाणे एक विशेष बाब म्हणुन शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन सी.एम.पी. प्रणाली द्वारे मंडळाच्या खात्यात जमा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br><br>तसेच शासन व्यवहारामध्ये संगणकीय प्रणालीद्वारे शासन महसुलाच्या रक्कमा जमा करण्याची कार्यपध्दती (NEFT/RTGS) सुरु आहे. परंतु मंडळाच्या वरील नियम/ अधिनियम यामध्ये सुधारणा झालेली नाही. तथापि, मा. कामगार आयुक्त यांच्या आदेशानुसार, शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन उप महाप्रबंधक, कृत महाप्रबंधक, अंबरनाथ यांना उपकराची रक्कम एक विशेष बाब म्हणुन RTGS द्वारे मंडळास जमा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि, मंडळांतर्गत जमा करण्यात येणाऱ्या उपकराच्या रकमा RTGS/NEFT/ECS/CMP या संगणकीय प्रणालीद्वारे व शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचनांनुसार आधुनिक पध्दतीने उपकराचा भरणा करण्यास मंडळाची मान्यता मिळावी, अशी विनंती सचिव यांनी केली. याबाबत सर्वंकष चर्चा होऊन खालील ठराव करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | | ठराव :<br><br>**मंडळांतर्गत जमा करावयाच्या उपकराची रक्कम धनाकर्षाव्यतिरिक्त RTGS/NEFT/ECS/CMP या संगणकीय प्रणालीद्वारे व शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचनांनुसार आधुनिक पध्दतीने (e-payment व इतर) जमा करुन घेणेबाबत शासन मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.** |
| १४. | **मंडळांतर्गत उघडण्यात आलेले अनावश्यक व समाधानकारक सेवा न देणा-या बँकांमधील खाते बंद करणेबाबत.** | सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, सद्यस्थितीत मंडळाची बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथे १ बचत खाते व २ चालु खाते (उपकर जमासाठी व TDS Payment साठी), बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर, मुंबई येथे १ बचत व १ चालु खाते (उपकर जमासाठी), सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया,बीकेसी, मुंबई येथे २ बचत खाती (कामगारांची नोंदणी फी/ कार्यालयीन खर्चासाठी), युनियन बँक ऑफ इंडिया, बान्द्रो (प.),मुंबई येथे १ बचत खाते (उपकर जमासाठी) अशी एकुण ८ खाती कार्यान्वीत आहेत. मंडळाच्या विविध ८ खात्यामधुन मंडळाचे व्यवहार होत असल्यामुळे मंडळाकडे उपलब्ध मनुष्यबळ लक्षात घेता इतक्या खात्याचे लेखे ठेवणे जिकरीचे होते.<br><br>वरील खात्यांपैकी, बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथुन मंडळांतर्गत खर्चाचे व्यवहार करण्यात येतात. मंडळाच्या सदर विविध खात्यांपैकी बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा येथील TDS खाते व सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया येथील बचत खाते यामधुन मंडळाचे व्यवहार होत नाहीत, त्यामुळे ती बंद करण्याबाबत मंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा, तसेच बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर येथील खात्यात जमा होणारी रक्कम फार मोठ्या प्रमाणात नसल्याने व त्यांची सेवा समाधानकारक नसल्याने बँक ऑफ महाराष्ट्र येथील खाती बंद करण्याबाबतही मंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा, असे सचिव म्हणाल्या. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांचीदेखील सेवा समाधानकारक नसल्याने, कामगार |

| | | |
|---|---|---|
| | | नोंदणी फी व वर्गणी फी जमा करण्यासाठी नव्याने दुस-या बँकेत खाते उघडण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.<br><br>याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की. मंडळाकडील अनावश्यक खाते बंद करुन मंडळाकरीता फक्त एक खाते उत्पन्नाकरीता, दुसरे खाते मंडळाच्या खर्चाकरीता व तिसरे खाते नोंदणी फी व वर्गणी फी करीता अशी फक्त ३ खातीच चालू ठेवावीत. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली. याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव:<br><br>**मंडळांतर्गत उपकराची रक्कम जमा करणेसाठी उघडण्यात आलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, बांद्रा (पूर्व), येथील व बँक ऑफ इंडिया येथील TDS Payment साठी उघडण्यात आलेले खाते बंद करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथिल नोंदणी फी/वर्गणी फी व कार्यालयीन खर्चासाठी उघडण्यात आलेले खाते सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांची सेवा समाधानकारक नसल्याने बंद करण्यात यावे. तसेच युनियन बँक ऑफ इंडिया, बांद्रा (प.) येथिल बँकेत कामगार नोंदणी फी व वर्गणी फी भरण्यासाठी नव्याने खाते उघडण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार संबधित बँका व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात यावे, असेही ठरले.** |
| १५. | **मंडळांतर्गत नोंदणी फि व वर्गणी फि साठी स्वतंत्र खाते उघडणे.** | याबाबत मुद्दा क्र. १४ मध्ये ठरल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. |
| १६. | **नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी पाळणाघर व आवासी** | मे. ए.एफ.सी. इंडिया लि. यांचेमार्फत जाणीव जागृतीचा कार्यक्रम राबवून कामगारांच्या नोंदणी करून बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी "शिशु पाळणा घर" व |

| | | |
|---|---|---|
| | विद्यालय बांधणेबाबत. | बांधकाम कामगारांना मुख्य प्रवाहात आणण्याकरीता "निवासी शिक्षण" देण्याचा उपक्रम करण्यास इच्छित असल्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे, असे मा. अध्यक्ष यांनी सांगितले. सदर प्रस्तावावर मंडळाने सविस्तर चर्चा करुन ठराव घेणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे, असेही मा. अध्यक्ष म्हणाले.<br>तदनंतर नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी "शिशु पाळणाघर" या विषयावर AFC India Pvt. Ltd. या संस्थेने सादरीकरण केले. यावर मा.कामगार आयुक्त यांनी मा. मंत्री (कामगार) महोदय यांना असे प्रतिपादन केले की, रोजगार हमी योजनेखाली राबविण्यात येणा-या 'पाळणाघर योजना', या योजनेबाबत माहिती घेवून त्या धर्तीवर मंडळांतर्गत पाळणाघर योजना राबविणेबाबत पुढील बैठकीत चर्चा करण्यात यावी. तसेच मंडळामध्ये नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी आवासी विद्यालय बांधण्याची तरतूद नसल्यामुळे आवासी विद्यालय चालू करता येणार नाही, असेही मा.कामगार आयुक्त यांनी स्पष्ट केले.<br>याबाबत सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव:**<br>**रोजगार हमी योजनेखाली राबविण्यात येणा-या 'पाळणाघर योजना', या योजनेबाबत माहिती घेवून त्या धर्तीवर मंडळांतर्गत 'पाळणाघर योजना' राबविणेबाबत पुढील बैठकीत चर्चा करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| १७. | **प्रधानमंत्री जीवनज्योती / जीवन सुरक्षा योजनेची कार्यपध्दती ठरविणेबाबत.** | दि.०४.०५.२०१५ रोजी मा. प्रधान सचिव, कामगार व तत्कालीन कामगार आयुक्त तथा अध्यक्ष यांच्यामधील झालेल्या चर्चेनुसार, दि.०५.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना बांधकाम कामगारांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. |

मंडळाच्या पुर्नस्थापनेनंतर दि.०२.११.२०१५ रोजीच्या बैठकीत सदर योजना लागू करणेबाबतच्या ठरावाच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनास दि.३०.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

सदर योजनांमध्ये सर्व 'नोंदीत बांधकाम' कामगारांऐवजी 'जिवीत नोंदीत बांधकाम कामगार' अशी सुधारणा करण्यात येत असून त्याची मंडळाच्या पुढील बैठकीत कार्योत्तर मंजूरी घेण्यात येईल असा प्रस्ताव शासनास दि.१९.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे. त्याबाबत मंडळाच्या दि.२९.०३.२०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीत 'जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना' प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करणेबाबतचा ठराव मान्य करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने दि. २७.०६.२०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये उक्त दोन्ही योजनांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर दोन्ही योजनांची कार्यप्रणाली तयार करण्याबाबत मा.कामगार उप आयुक्त, श्री. काकतकर यांना मा. कामगार आयुक्त यांनी सूचित केले होते त्या अनुषंगाने त्यांनी सदर योजना राबविण्याबाबत त्यांचे अभिप्राय सादर केलेले आहेत.

सदर योजनेच्या नियमावली नुसार, योजनेत सहभागी असणा-या बँकेमध्ये १८-७० या वयोगटातील बचत खाते धारकांना या योजनेत सहभागी होता येणार आहे. या योजनेत सहभागी होण्याकरीता ऑटो डेबीट पदध्तीने विहीत अर्ज भरुन त्यांच्या बचत खात्यातुन प्रिमियमची रक्कम दयावयाची आहे. प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजनेकरीता प्रति वर्षी रु. १२ व प्रधानमंत्री जीवनज्योती योजनेकरीता प्रतिवर्षी रु.३३० इतका प्रिमियम दयावयाचा आहे. सदर योजनेची अंमलबजावणी इन्शोरन्स कंपनीने तयार केलेल्या प्रमाणित पदध्तीनुसार होणार आहे. नोंदणी अर्ज/ Authorization अर्ज सहभागी होणा-या बँकेने जतन करावयाचा आहे. सदर योजनेत सहभागी होण्याकरीता लाभार्थ्यांने बँकेत बचत खात्याद्वारे प्रिमियम रक्कम भरावयाची आहे. मंडळातर्फे ही योजना लागु

| | | |
|---|---|---|
| | | करावयाची झाल्यास बांधकाम कामगारांना प्रथम त्यांच्या बचत खात्यातुन प्रिमियमची रक्कम संबंधित बँकेस अदा करावी लागेल व तद्नंतर त्या रक्कमेची प्रतिपुर्ती मंडळातर्फे करावी लागेल. सदर रक्कमेची प्रतिपुर्ती करताना कामगाराने बँकेस अदा केलेल्या प्रिमियम रक्कमेची ऑनलाईन पावती सादर करणे बंधनकारक राहिल.अशा प्रकारे कार्यवाही करण्याबाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन पुढील कार्यवाही करणे उचित होईल, असे श्री.काकतकर यांनी कळविले असल्याचे मंडळाच्या सचिव यांनी सांगितले. यावर सखोल चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव:<br>**ज्या बांधकाम कामगारांनी प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना व प्रधानमंत्री जीवन सुरक्षा विमा योजना या योजनांमध्ये सहभाग घेतलेला आहे, त्यांनी सदर रक्कम त्यांच्या बचत खात्यातून Debit झाल्याची पावती सादर केल्यास, त्यांनी अदा केलेल्या प्रिमियम रकमेची प्रतिपूर्ती मंडळामार्फत करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १८. | **नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबवावयाच्या अवजारे / हत्यारे खरेदीसाठी रु.५०००/- च्या योजनेबाबत.** | केंद्र शासनाच्या दि.२७.०२.२०१४ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र.०५ मधील उपमुद्दा क्र.०५ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोंदणीकृत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या कल्याणकरीता ३ वर्षातून एकदा प्रति कुटूंब रूपये ५ हजार अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक असल्याचे नमूद आहे.<br>त्या अनुषंगाने मंडळाच्या दि.०२.११.२०१५ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून मंडळाकडील नोंदीत लाभार्थी कामगारांच्या प्रति कुटूंबास दर तीन वर्षातून एकदा रूपये ५ हजार अवजारे/ हत्यारे खरेदी करण्याकरीता अर्थसहाय्य देण्यात यावे असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आलेला आहे. |

सदर योजना बांधकाम कामगारांना राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.११.१२.२०१५ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दि.०५.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेस मान्यता देण्यात आलेली असून जिल्हा स्तरावर उक्त योजनेची अंमलबजावणी करणेबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना दि.२९.०४.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

दि.२९.०४.२०१६ रोजीच्या पत्रामध्ये सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांची मंडळाकडे सलग ३ वर्ष नोंदणी असावी, अशी अट घालण्यात आली होती. सदर अटीमुळे मंडळाकडील सर्वच नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ मिळणार नसल्याने, याबाबत ब-याच लोकप्रतिनिधी तसेच कामगार संघटनांनी नाराजी व्यक्त करून असा मुद्दा उपस्थित केला आहे की, प्रत्येक नोंदीत कामगारांस या योजनेचा लाभ सुरवातीस देण्यात यावा व पुढील ३ वर्षानंतर लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांची मंडळाकडे सलग ३ वर्षे नोंदणी असावी..

दि.१६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता रू.५०००/- अर्थसहाय्य ही योजना सर्व नोंदीत पात्र बांधकाम कामगारास लागू करण्यात यावी तसेच, ३ वर्षानंतर सदर योजनेतंर्गत पुन्हा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांचे मागील ३ वर्षे मंडळाकडे नुतनीकरण झालेले असणे अनिवार्य करावे असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.०५.०७.२०१६ रोजी सादर करण्यात आलेला आहे. त्यावर शासनाने केंद्र शासनास प्रस्ताव पाठवून फेरप्रस्ताव शासनास सादर करावा अशी सूचना दिलेली आहे त्या अनुषंगाने मंडळामार्फत केंद्र शासनास दि.०१.०९.२०१६ रोजी पत्रव्यवहार करून सदर योजनेबाबत मार्गदर्शन मागविले आहे.असे सचिव यांनी सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव:**<br>**नोंदित बांधकाम कामगारांसाठी राबवावयाच्या अवजारे/हत्यारे खरेदीसाठी, रू. ५०००/- अर्थसहाय्य देणेबाबतच्या योजनेखाली केंद्रशासनाची मान्यता मिळाल्यानंतर कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| १९. | **मोबाईल व्हॅनद्वारे बांधकामाच्या साईटवर जाऊन मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे.** | मंडळाच्या दि. १६.०६.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय क्र. २० मध्ये मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती फिरत्या वाहनाद्वारे (मोबाईल व्हॅनद्वारे) करणेबाबत चर्चा करण्यात आली व त्यामध्ये मंडळाच्या योजनांची जनजागृती जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत नोंदणी वाढणार नाही व त्यामुळे प्रशासकीय खर्चासाठीही कमी निधी उपलब्ध होत आहे. तरी, मंडळाच्या योजनांची जनजागृती कोणकोणत्या माध्यमातून करावी याबाबतच्या सुचना सर्व सदस्यांनी पुढील बैठकीत कराव्या असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले होते, असे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.<br>त्या अनुषंगाने, मे. दत्तात्रय ॲडव्हरटायझिंग कंपनी, अमरावती यांनी महाराष्ट्रातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रामध्ये चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती फिरत्या वाहनाद्वारे करण्यासाठीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. मोबाईल व्हॅन हे जनसामान्यांपर्यंत योजनांची माहीती पोहचविण्याचे व जननागृती करण्यासाठीचे उपयुक्त माध्यम आहे, असे न्यायालयाने म्हटले असल्याचे सदर प्रस्तावात नमुद आहे. सदर कंपनीचा, शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागाचा शासन निर्णय दि.१९.०३.२०१६ नुसार दर करार करण्यात आला आहे. याबाबत, मंडळाने विचार विनिमय करुन योग्य तो निर्णय घ्यावा, असे सचिव यांनी सांगितले.<br>यावर मा.मंत्री महोदय यांनी असे प्रतिपादन केले की, बांधकाम कामगारांची नोंदणी |

| | | |
|---|---|---|
| | | वाढविण्याकरीता मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे आवश्यक आहे. याकरीता राज्यभरात चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात यावी. यावर मा. अध्यक्ष यांनी असे प्रतिपादन केले की, मे.दत्तात्रय ॲडव्हरटायझिंग यांचे शासनमान्य दरकरार असल्याने सदरचे काम मे.दत्तात्रय ॲडव्हरटायझिंग यांना देण्यात यावे. यावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते खालील ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव:**<br>**बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी मंडळाच्या योजनांची चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात यावी व सदर कामासाठी शासनमान्य दरकरार असलेल्या मे.दत्तात्रय ॲडव्हरटायझिंग यांना आदेश देण्यात यावेत, त्यापुर्वी याविषयीची सविस्तर कार्यपध्दती निश्चित करुन संबंधितांसोबत करारनामा करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २०. | **मे.डेक्कन ब्रोकर्स यांच्या EMD Refund व नियुक्ती रद्द करणेबाबत.** | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.२८.१२.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी लागू करावयाच्या आरोग्य विमा योजनेसाठी मे. डेक्कन ब्रोकर्स यांची विमा ब्रोकर्स म्हणून नियुक्त करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने मे. डेक्कन ब्रोकर्स यांची दि.२९.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विमा योजनेकरीता विमा ब्रोकर म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. मे. डेक्कन विमा ब्रोकर्स यांना ई-निविदा प्रक्रियेनुसार मंडळाकडे जमा केलेली EMD रक्कम रू. १० लाख दि. ३०.०७.२०१६ रोजी RTGS मार्फत त्यांना परत करण्यात आली आहे<br>तथापि, दि.२३.०६.२०१६ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत |

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या मंडळाच्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्य विम्याच्या छत्राखाली आणण्यासाठी त्यांचा सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणा-या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" या योजनेत समावेश करावा असे सूचित केले आहे. मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी महात्मा फुले आरोग्य विमा योजना राबविण्याचे ठरले असल्याने, मे. डेक्कन ब्रोकर्स प्रा. लि. यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत मंडळाने निर्णय घ्यावा, असे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे मंडळ सचिवांनी सांगितले.<br>त्यावर सविस्तर चर्चा होऊन खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव:<br>**मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदेशानुसार मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी राज्यशासनाची "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" राबविण्यात येणार असल्याने मे.डेक्कन ब्रोकर्स लि. यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी व त्यांच्याकडून सदर कामासाठी घेण्यात आलेली रू. २५ लाख रकमेची परफॉर्मन्स गॅरंटी त्यांना परत करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २१. | **शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा पूर्वलक्षी प्रभावाने लाभ देणेबाबत.** | मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, अनेक जिल्हा कार्यालयांकडून शैक्षणिक अर्थसहाय्य योजने संदर्भात काही शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. त्यावर चर्चा करून ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर मुद्दे खालील प्रमाणे :- |

| | | |
|---|---|---|
| | | **१.सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर**<br>एखादा कामगार नोंव्हेंबर २०१५ मध्ये मंडळामध्ये नोंदीत झाला तर त्या कामगाराच्या पाल्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ७५ % उपस्थितीबाबत लाभ द्यावा अगर कसे याबाबत मार्गदर्शन मिळावे.<br><br>२.एखादा कामगार जून २०१५ मध्ये मंडळामध्ये नोंदीत झाला तर त्या कामगाराच्या पाल्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ७५ % उपस्थितीबाबतचा लाभ मिळणेकरीता सदर अर्जदाराने अर्ज शैक्षणिक वर्षाच्या कोणत्या महिन्यात भरणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे.<br><br>मुददा क्र. १ व २ बाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे एकत्रित ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**७५% उपस्थितीबाबत संपूर्ण वर्षाचे हजेरीपत्रक आवश्यक असल्याने सदर योजनेसाठी कामगाराने शैक्षणिक वर्षाच्या शेवटी अथवा तदनंतर तथापि नोंदणी कालावधीमध्ये अर्ज करणे आवश्यक आहे. म्हणजेच कामगार नोंदणीच्या लगतचे मागील पूर्ण झालेल्या वर्षासाठी अथवा नोंदणी कालावधीत पूर्ण होणा-या वर्षासाठी सदर योजनेचा लाभ घेता येईल, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**<br><br>१. सहाय्यक कामगार आयुक्त, नांदेड<br>• बांधकाम कामगारांच्या पाल्यांनी ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेले आहेत त्याच |

| | | |
|---|---|---|
| | | शैक्षणिक वर्षात कामगारांनी बांधकाम कामगार म्हणून नोंदणी झालेली आहे. अशा कामगारांची शैक्षणिक योजनेकरीता अर्ज केलेले आहेत. सदर लाभार्थी कामगारांची नोंदणी ही त्यांच्या पाल्यांनी संबंधित शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्यानंतर सर्वसाधारणपणे माहे जुलै नंतर झालेली आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष एकच आहे. अशा परिस्थितीत लाभार्थी कामगारांना लाभाचे वाटप करावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे.<br><br>**२. सरकारी कामगार अधिकारी ,जालना**<br>• श्री. शाम जाधव यांनी त्यांच्या दोन पाल्यांना अभियंत्रिकी किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इ. साठी रक्कम् रू.३५,०००/- देण्याबाबत दोन अर्ज सादर केले आहेत. सदर अर्जाची छाननी केली असता कामगाराची नोंदणी दि.१२.०१.२०१६ रोजी करण्यात आलेली आहे. व त्यांनी लाभ मिळण्याबाबत सादर केलेल्या अर्जामध्ये त्यांच्या पाल्यांनी माहे जुन- जुलै २०१८ मध्यें अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे, त्यांचे पाल्य शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये शिक्षण घेत आहे. सदरचा देण्यात येणारा लाभ हा कामगाराच्या नोंदणीपूर्वी असल्याने लाभ अदा करण्यात यावा किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे.<br><br>**३. सहाय्यक कामगार आयुक्त, लातूर**<br>• सौ. उषा पाटील यांची नोंदणी दि.२२.०४.२०१५ रोजी झालेली आहे. त्यांच्या पाल्याने अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षासाठी सन २०१४-१५ साठी प्रवेश घेतलेला आहे. सदर अर्जदाराने त्याच्या पाल्यास लातूर कार्यालयात दि.३०.०४.२०१५ रोजी शैक्षणिक अर्थसहाय्यासाठी रू.३८००० एवढे अर्थसहाय्य मिळण्याकरीता अर्ज |

F.BOC Mtg.03.09.2016-VPV-SPS

| | | |
|---|---|---|
| | | केला आहे. अर्जदाराने त्याच्या पाल्याचे सन २०१४-१५ या वर्षाचे ०५.०३.२०१५ या दिनांकाचे महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तरी बांधकाम कामगाराच्या पाल्यास सन २०१४-१५ या पूर्ण वर्षाचा लाभ देता येईल का? याबाबत मार्गदर्शन मागितले आहे<br><br>**४. सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली**<br>• सदर पत्रात सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली यांनी शैक्षणिक लाभ हे चालू शैक्षणिक वर्षी देण्यात यावे किंवा कसे याबाबत विचारणा केली आहे. मुददा क्र. ३,४,५ व ६ बाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे एकत्रित ठराव घेण्यात आला.<br><br>**ठराव :**<br>**कामगारांची नोंदणी ज्या वर्षात झालेली आहे, त्या शैक्षणिक वर्षाचे लाभ घेण्यास कामगार / अर्जदार पात्र आहे. तथापि, एका नोंदणी कालावधीमध्ये एकाच शैक्षणिक वर्षासाठी लाभ अनुज्ञेय असेल, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २२. | **मंडळाच्या योजनांबाबत जिल्हा कार्यालयांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.** | १.सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर कार्यालयात मंडळाकडे बांधकाम कामगार म्हणून नोंदीत आहेत व त्यांची ओळखपत्रे गहाळ झालेली आहेत असे कामगार या कार्यालयाकडे त्यांचे ओळखपत्राची दुबार प्रत मिळणेबाबत वारंवार अर्ज करत आहेत. तरी दुबार ओळखपत्र द्यावे किंवा कसे? व द्यावयाचे असल्यास कसे द्यावे? याबाबत मार्गदर्शन मागितले आहे.<br>याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे एकत्रित ठराव घेण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | | ठराव:<br>**महाराष्ट्र इमारत बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना (नक्कल/दुय्यम/duplicate) ओळखपत्र देण्याबाबत बांधकाम कामगारांकडून त्यांच्या नोंदणी पावतीची प्रत तपासून व शुल्क रू. २० घेऊन (नक्कल/दुय्यम/duplicate) ओळखपत्र देणेबाबत असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**<br><br>२.सहाय्यक कामगार आयुक्त लातूर कार्यालयामार्फत प्राप्त अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना यांचे निवेदनात मंडळाच्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे देण्यात येणा-या विविध लाभाचे अर्ज, प्रस्ताव या कार्यालयाने दाखल करून घ्यावे व याबाबत सर्व अधिकार संघटनेला असल्याबाबतचे म्हणणे सदर संघटनेचे आहे. त्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्त, लातूर कार्यालयाने मार्गदर्शन मागितले आहे यावर सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला.<br><br>ठराव :<br>**याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार बांधकाम कामगारांची नोंदणी अथवा नुतनीकरण स्वत: बांधकाम कामगार प्रत्यक्ष हजर असल्यावरच करण्यात यावे. तसेच बांधकाम कामगारांना नोंदणी पावती देणे, ओळखपत्र वाटप करणे, मंडळाच्या योजनांतर्गत लाभ प्रदान करणे या सर्व गोष्टी प्रत्यक्ष कामगारांसच देण्यात याव्यात, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २३. | उपकर परताव्याची प्रकरणे मंजूर | मंडळास जास्तीच्या दराने उपकर भरणे, उपकराची चुकीची परीगणना करणे, इतर |

| | | |
|---|---|---|
| | **करणेबाबत.** | राज्यामध्ये महाराष्ट्रातील कंपन्यांनी बांधकाम करुन उपकर जमा करणे इ. कारणांमुळे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या खात्यात चुकीने उपकराच्या खालील प्राधिकारणांकडून भरणा केलेला आहे व सदर प्राधिकारणांनी चुकीने भरणा केलेल्या उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी केलेली आहे, असे मा.कामगार आयुक्त यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.<br>१) उपकर निर्धारण अधिकारी, मध्यप्रदेश इंदौर.<br>२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, लातूर<br>३) मे. पायरोटेक इंडस्ट्रिज (इंडिया) प्रा. लि. मुंबई<br>४) नागपूर महानगर पालिका, नागपूर<br>५) श्रीमती. छाबडा, सहायक आयुक्त , नागपूर महानगरपालिका, नागपूर<br>६) अदाणी पॉवर, गोंदिया<br>७) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई<br>८) शिवाजी कॉलेज, अकोला<br>९) भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, मुंबई<br>१०) पाटबंधारे कोल्हापूर<br>११) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई<br>१२) उप अभियंता सिन्नर जिल्हा परिषद |

| | | |
|---|---|---|
| | | १३) एजे बायोटेक पुणे<br>१४) एम.आय.डी.सी. लातूर<br>१५) शादीक अँड कंपनी इंजिनीयर<br>१६) नेहरु सायंस सेंटर, मुंबई<br>१७) एम.आय.डी.सी. लातूर<br>१८) श्री सुरेश देव, नागपूर<br>१९) मालेगाव महानगर पालिका<br>२०) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद जळगाव<br>२१) लघु पाटबंधारे विभाग कोल्हापूर<br>२२) मुख्य अधिकारी, कागल नगर परिषद<br><br>प्रस्तुत प्रकरणी संबंधित जिल्हा कार्यालयांना पत्र पाठवून संबंधित प्राधिकरणास प्रत्यक्ष भेट देवून, सखोल चौकशी करून त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल विभागीय कार्यालयाच्या अभिप्रायासह मंडळास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.<br>सदर यादीतील अनु. क्र. २ श्रीम. छाबडा, सहाय्यक आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपुर यांचा उपकर परतावा रक्कम रु. २८२७०६/- इतका असुन सहाय्यक कामगार आयुक्त, नागपुर यांचे कडुन याबाबत अभिप्राय प्राप्त झालेले असुन श्रीम. छाबडा यांनी सदरहु रक्कम गैरसमजुतीने व अनावधानाने मंडळाच्या खात्यात जमा केल्यामुळे सदर रक्कम मंडळाच्या खात्यात जमा झाली किंवा कसे याबाबत शाहनिशा |

| | | |
|---|---|---|
| | | करुन उक्त रक्कम मंडळाच्या खात्यात जमा झाली असल्यास रु.२८२७०६/- संबंधितास परत करण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. याबाबत बँक ऑफ इंडिया, ताडदेव रोड शाखा, मुंबई यांना तपशिल पाठवुन अहवाल मागविण्यात आलेला आहे. परंतु याबाबत अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत.<br>तसेच यादीतील अनु क्र. ३, मे.खरे ॲन्ड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नागपूर यांच्या उपकर परतावा रक्कम रु. १,०८,३५,२४७/- बाबत, सहाय्यक कामगार आयुक्त, अकोला यांनी अपर कामगार आयुक्त, नागपूर यांना अहवाल पाठविलेला असून, त्याची प्रत मंडळास सादर केलेली आहे. परंतु याबाबत अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत, असे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणून दिले.<br>तसेच यादीतील अनुक्रमांक १७ कार्यकारी अभियंता , MIDC लातूर यांच्या दिनांक 29-03-2016 च्या पत्रान्वये मे किर्ती ॲग्रोव्हेट लि. यांचेकडून सदर भुखंड महानगरपालिका हददीमध्ये येत असल्याचे ग्रहित धरून त्याप्रमाणे उपकराच्या रकमेची वसूली करण्यात आलेली आहे. तथापि सदर औदयोगिक क्षेत्र ग्रामपंचायत हद्दीमध्ये येत असल्याने त्यांनी भरणा केलेली रु. ८,३८,९७०/- ही जास्तीची रक्कम परत करण्याबाबत कळविले आहे. याबाबत संबधित सहायक कामगार आयुक्त, लातूर व कामगार उपायुक्त यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अहवालानुसार मे किर्ती ॲग्रोव्हेट लि. यांनी भरणा केलेली रु. ८,३८,९७०/- ही जास्तीची रक्कम परत करण्याबाबत शिफारस केलेली आहे.<br>यावर मा.मंत्री महोदय यांनी असे प्रतिपादन केले की, उपकराच्या परताव्यांचे प्रत्येक प्रकरण मंडळासमोर ठेवण्याची आवश्यकता नाही. प्रकरणासाठी आवश्यक अहवाल संबंधितांकडून प्राप्त होताच मंडळाचे मा.अध्यक्ष व मा.कामगार आयुक्त यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करावी असे निर्देश दिले. त्यानूसार खलीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | | **असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.** |
| २५ | आयत्यावेळचे विषय | १.मंडळाचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्देशनास आणून दिले की, मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीतील विषय क्र. ६ अन्वये मंडळाच्या कामकाजासाठी १ Senior Consultant ३ महिन्यांसाठी व १ Consulant १ वर्षासाठी घेण्याचे ठरले होते. तथापि, याबाबत मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर दोन्ही Consultants ची नियुक्ती ६ महिन्यांसाठी करण्यात आली आहे. सदर बदलाची मंडळाच्या मागील बैठकांच्या इतिवृत्तात नोंद घेणं अनावधानाने राहून गेले आहे. तरी सदर बदलाची नोंद मंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये घेण्यास मंडळाची मान्यता असावी.<br>याबाबत सविस्तर चर्चा होऊन मंडळाच्या कामासाठी घेण्यात आलेल्या दोन्ही Consultant च्या नियुक्तीबाबत घेण्यात आलेल्या दिनांक ०२.११.२०१५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ६ मध्ये वरिलप्रमाणे बदल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>२.मा.मंत्री (कामगार) महोदय यांनी बांधकाम कामगारांचे ९० दिवस काम केल्याच्या दाखल्याची अट काढण्याबाबत व गुजरात राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्येही बांधकाम कामगारांचे सेल्फ सर्टीफिकेशन करावे का, याबाबत विधी व न्याय विभागाकडून अहवाल मागविण्यात यावा, असे निदेश दिले.<br><br>३.मंडळाकडे आतापर्यंत ५ लाख बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून त्यापैकी ३ लाख नोंदणी जिवीत आहे असे श्री.कुटासकर यांनी नमुद केले. यासाठी कामाच्या ठिकाणी कंत्राटदारामार्फत कामगारांची नोंदणी केली जावी याकरिता श्री.कुटासकर यांनी आग्रह धरला. |

बैठकीच्या शेवटी मा. कामगार आयुक्त यांनी मा. मंत्री (कामगार) महोदय यांचे व उपस्थित सर्वांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

*********

को. यादव

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर
बांधकाम कामगार कल्याणकारी
मंडळ, मुंबई-४०० ०५१.